Thursday, January 29, 2009

**6 lakh rupees fine imposed in four month's for smoking in public place**

Publication: Dainik Sagar, Edition: Thane, Journalist: Bureau, Page No: 3

# सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्यांकडून चार महिन्यात सुमारे सहा लाखांची वसुली

प्रतिनिधी

**मुंबई :- सार्वजनिक ठिकाणी बंदी आल्यापासून तीन महिन्यांच्या आतच एफडीएने सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान बंदीचा नियम मोडणाऱ्यांकडून नोव्हेंबर २००८ पर्यंत ५ लाख ७९ हजार १२५ रूपये दंड म्हणून वसूल केला आहे. एखाद्या राज्यातून झालेली ही देशातील सर्वात मोठी वसुली आहे.**

सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास २००४ पासूनच बंदी होती, मात्र पुरेशी जनजागृती, आवश्यक मनुष्यबळ व संरचनेच्या अभावी आवश्यक परिमाण साधले जात नव्हते. केंद्र सरकारने सार्वजनिक स्थळ नियम २००८ अंतर्गत धूम्रपानास मनाई करून सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदीला बळकटी आणली. ही बंदी २ ऑक्टोबरपासून अंमलात आली



ती प्रामुख्याने सेकंडहॅन्ड स्मोक (धूम्रपान करणाऱ्या धुराचा त्रास) पासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी अंमलात आली होती आणि त्यायोगे धूम्रपान करणाऱ्यांच्या सवयीला आळा बसू लागला. या मोहिमेअंतर्गत २५० एफडीए अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांचे सहकार्य याद्वारे हा दंड यशस्वीरित्या वसूल करण्यात आला आहे.

यासंदर्भात एफडीएचे सहआयुक्त मोहन पाटणकर म्हणाले, ही बंदी खूप आधीपासून म्हणजेच २००४ पासून लागू होती आणि आम्ही तेव्हाहि यासाठी खूप प्रयत्न केले होते. आताच्या केवळ चार महिन्यांत (ऑगस्ट-नोव्हेंबर ०८) झालेल्या ५ लाख ७९ हजार १२५ रुपये इतक्या दंडवसुलीच्या तुलनेत २००४-२००८ (जून) पर्यंतची दंडवसुली केवळ २ लाख ५५ हजार इतकी होती. अर्थात यामागचे मोठे कारण संरचना, आवश्यक मनुष्यबळ व वाहनाची कमतरता हेच होते.

यासंदर्भात हेलिस सेखसरिया इन्स्टिट्युट फॉर पब्लिक रिसर्च या संस्थेचे संचालक डॉ. पी.सी.गुप्ता म्हणाले, धूम्रपानबंदीच्या संदर्भात उत्साहवर्धक चिन्हे दाखवून दिल्याबद्दल आम्ही एफडीएची प्रशंसा करतो आहोत. आम जनतेच्या दृष्टीकोनात बदल करण्यासाठी आणि धूम्रपानविरोधात जागृती करण्यासाठी हे दंड महत्वाचे आहेत. आम जनता या बंदीचे महत्त्व जाणून आहे आणि त्यामुळे ती या बंदीला पाठबळ देते.